॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३३८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

✲ सुविचार ✲
नव्या पुस्तकाइतके
जुने काहीच नाही.

जागतिक पुस्तक दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!





खडकवाडी वीज उपकेंद्रावर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

पान क्र. २ वर



राजकीय मतभेद विसरून विकासासाठी एकत्र येण्याचा संदेश

पान क्र. ३ वर



कोपरगावात राष्ट्रवादीचा पालिकेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार

पान क्र. ४ वर

# पारनेरात उष्माघाताचा आणखी एक बळी

## प्रखर उष्णतेमुळे हृदयविकाराचा झटका । प्राथमिक शिक्षिका उषा फापाळे यांचे निधन

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तापमानाचा फटका नागरिकांना बसत असून उष्माघातामुळे आणखी एक मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. गारगुंडी येथील रहिवासी आणि पिंपळगाव रोठा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका उषा पोपट फापाळे (वय ५०) यांचे उष्माघातामुळे हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने गुरुवारी दुपारी उपचारादरम्यान निधन झाले.

टाकळी ढोकेश्वर ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य अधिकारी डॉ. ऋत्विज म्हस्के खिलारी यांनी ही माहिती दिली. मिळालेल्या माहितीनुसार, फापाळे या नेहमीप्रमाणे गुरुवारी सकाळी गारगुंडी येथून दुचाकीवरून पिंपळगाव रोठा येथे शाळेत गेल्या होत्या. सध्या शाळा सकाळच्या सत्रात भरत असल्याने दुपारी सुमारे १२ वाजता शाळा सुटल्यानंतर त्या प्रखर उन्हातच परतीच्या प्रवासाला निघाल्या.



घरी पोहोचल्यानंतर त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. अंगात अशक्तपणा, चक्कर येणे अशी लक्षणे दिसू लागल्याने त्यांना तातडीने कान्हूर पठार येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी प्राथमिक तपासणीनंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्याचा सल्ला दिला. मात्र, प्रकृती झपाट्याने खालावत गेल्याने उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. यापूर्वी ढवळपुरी येथील माळवडी भागात ४५ वर्षीय महिलेचा शेतात काम करताना उष्माघातामुळे मृत्यू झाला होता. त्यामुळे तालुक्यात उष्णतेमुळे मृत्यूंची संख्या वाढत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, मृतदेहाची उत्तरीय तपासणी टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात करण्यात आली आहे.

तालुक्यात तापमानात लक्षणीय वाढ होत असल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे यांनी सांगितले की, दुपारी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत बाहेर पडणे टाळावे. अत्यावश्यक असल्यास डोक्यावर टोपी किंवा कपडा वापरावा. हलकी सुती वस्त्रे परिधान करावीत, भरपूर पाणी पिण्यावर भर द्यावा.

### आरोग्य विभागाचा इशारा

■ तालुक्यात तापमानात लक्षणीय वाढ होत असल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे यांनी सांगितले की, दुपारी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत बाहेर पडणे टाळावे. अत्यावश्यक असल्यास डोक्यावर टोपी किंवा कपडा वापरावा. हलकी सुती वस्त्रे परिधान करावीत. भरपूर पाणी पिण्यावर भर द्यावा.

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यावरील ईडीची कारवाई रद्द

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

माजी राज्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्राजक्त तनपुरे यांच्याविरूद्ध सुरू असलेली ईडीची कारवाई आता रद्द करण्यात आली आहे. त्यांच्याविरूद्ध सुरू असलेली चौकशी थांबविण्यात यावी, या प्रकरणात जप्त करण्यात आलेली त्यांची मालमत्ता मुक्त करावी, असा आदेश न्यायालयाने दिला आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या गुरूवारी मतदान होत आहे. त्याच्या आधी हा निकाल आल्याने वेगळी चर्चा सुरू झाली आहे. भाजप नेत्यांसोबत झालेल्या चर्चेनंतर तनपुरे यांनी ही निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जाते. आता तनपुरे यांच्या मागील एऊचा ससेमिराही संपणार आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी ईडीकडून २०२१ पासून तनपुरे यांची चौकशी सुरू होती. त्यामध्ये त्यांच्या साखर कारखान्याची मालमत्ताही जप्त करण्यात आली होती. विदर्भातील राम गणेश गडकरी सहकारी साखर कारखान्याच्या विक्री आणि लिलावामध्ये गैरव्यवहार झाल्याचा ठपका ठेवत ईडीने या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. गडकरी कारखाना प्राजक्त तनपुरे यांच्या मालकीच्या 'प्रसाद शुगर अँड अलाईड इन्स्ट्रुमेंट्स' या कंपनीने लिलावात विकत घेतला होता. या व्यवहारात मनी लाँड्रिंग झाल्याचा संशय व्यक्त करत ईडीने नागपूरमधील ७.६ कोटी रुपयांच्या मालमत्तेसह कारखान्याची जमीन जप्त केली होती. हे प्रकरण न्यायालयात सुरू होते. ईडी न्यायालयाने त्यामध्ये आता तनपुरे यांना दिलासा दिला आहे.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### पाणउतारा

विरोधकांच्या नावाने
उर कशाला बडवता
सत्तेमध्ये राहूनही
उगाच रस्ते अडवता

प्रश्न सुटेना आतमध्ये
उत्तर शोधता बाहेर
हुसकावून देईपर्यंत
घेता कशाला आहेर

वीरभूमी

## SPOT NEWS

### माजी सरन्यायाधीश बी. आर. गवईंची बागेश्वर धामला सहकुटुंब भेट

**● भोपाळ –** भारताचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मध्यप्रदेशातील प्रसिद्ध आणि तितक्याच वादग्रस्त 'बागेश्वर धाम'ला सहकुटुंब भेट दिली आहे. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गवई यांनी पत्नी तेजस्विनी आणि मुलगा ज्योतिरादित्य यांच्यासह बागेश्वर बालाजीचे दर्शन घेऊन धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा आशीर्वाद घेतला. गवई कुटुंबाने बागेश्वर धामवर विधिवत पूजन करून देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली. यावेळी त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याशी धार्मिक आणि सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा केली. गवई यांनी धामातील कॅन्सर रुग्णालय, गुरुकुल आणि संस्कृत शिक्षणाच्या उपक्रमांची पाहणी करून त्यांचे कौतुक केले. सनातन संस्कृती बळकट करण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे आहेत असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.


### राज्य शिखर बँक गैरव्यवहार प्रकरणाला अखेर पूर्णविराम

**● मुंबई –** राज्याची शिखर बँक असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांना विशेष सत्र न्यायालयाने दोषमुक्त केले. त्यामुळे या प्रकरणाला आता पूर्णविराम मिळाला आहे. हे प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला अहवाल विशेष न्यायालयाने स्वीकारला होता. त्यातच आता आ. रोहित पवार यांनाही दोषमुक्त केल्याने या शिखर बँक घोटाळा प्रकरणाला अखेर पूर्णविराम मिळाला. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याचा तपास बंद झाला आहे.

# अभिनेते रितेश देशमुख-जिनिलिया देशमुख एसटीचे ब्रॅण्ड ॲम्बेसिडर

**● मुंबई । वीरभूमी–**

महाराष्ट्राची 'लालपरी' म्हणून ओळखल्या जाणा-या राज्य परिवहन महामंडळाला आता नव्या चेह-यांची साथ मिळणार आहे. अभिनेते रितेश विलासराव देशमुख आणि त्यांच्या पत्नी अभिनेत्री जिनिलिया रितेश देशमुख यांची एसटी महामंडळाच्या ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यासाठी आकर्षित करण्यासाठी आणि एसटीची प्रतिमा अधिक आधुनिक व आकर्षक करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक येत्या दोन दिवसांत रितेश विलासराव देशमुख आणि जिनिलिया रितेश देशमुख यांच्यासोबत अधिकृत करार करणार असल्याची माहिती समोर आली आहे. हा करार पाच वर्षांसाठी असणार असून, या काळात दोघेही एसटीच्या विविध जाहिराती, प्रचार मोहिमा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होताना दिसतील. ग्रामीण आणि शहरी भागातील प्रवाशांपर्यंत एसटीची सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सदर कराराचे हस्तांतरण केले जाणार आहे. यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून विनंती केली आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर या करार हस्तांतरण कार्यक्रमासाठी आपला बहुमूल्य वेळ राखून ठेवण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

याआधी मकरंद अनासपुरे आणि दिवंगत विक्रम गोखले यांनी ही जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या माध्यमातून एसटीला एक वेगळी ओळख मिळाली होती. आता रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख यांच्या लोकप्रियतेचा फायदा घेत एसटी महामंडळ नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. सोशल मीडियावरही या निर्णयाची चर्चा रंगली असून, चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. येत्या काळात या जोडीला 'लालपरी'च्या प्रचारासाठी विविध कार्यक्रम आणि मोहिमांमध्ये पाहायला मिळणार आहे.

# कमी लिंग गुणोत्तर असलेल्या गावांवर लक्ष केंद्रित करा

## जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया । महिला व बालविकास विभागाची आढावा बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये लिंग गुणोत्तर कमी आहे अशा प्रत्येक तालुक्यातील १५ गावांची निवड करून त्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये १५ दिवसांपेक्षा अधिक काळ गैरहजर असणाऱ्या मुलींची माहिती नियमितपणे सादर करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम, परिविक्षा अधिकारी योगिराज जाधव व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ.आशिया म्हणाले, गत तीन महिन्यांत विभागाने ४८ बालविवाह रोखण्यात मिळवलेले यश उल्लेखनीय आहे. यापुढेही या कामात अधिक दक्षता घ्यावी. बालविवाह प्रतिबंधासाठी प्रभावी समन्वय व सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक आहे.

मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत तालुकास्तरावर नियमित बैठका आयोजित करण्याबाबत दक्षता घ्यावी, योजनेची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

महिला हेल्पलाईन क्रमांक १८१ व बालकांसाठी १०९८ या टोलमुक्त क्रमांकाची व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध व निवारण कायद्यांतर्गत सर्व कार्यालयांमध्ये अंतर्गत समित्या स्थापन करणे बंधनकारक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून मुलींचे शिक्षण व सक्षमीकरण यावर भर द्यावा, असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले. बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी विभागाच्या कामकाजाचा आढावा सादरीकरणाद्वारे मांडला.

# धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत १०१.७७ टीएमसी अधिकचा पाणीसाठा

## एल-निनोचा प्रभाव लक्षात घेऊन पाणी जपून वापरा : मुख्यमंत्री देवेंद्र फड

**● मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा १०१.७७ टीएमसी पाणीसाठा अधिकचा आहे. गतवर्षी हा साठा ५५१.८६ टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पाऊसाच्या अनियमततेमुळे पुढील वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा आणि एल-निनो प्रभावामुळे संभाव्य परिणामांची माहिती दिली.

एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी ८७२ टीएमसी तर याच दिवशी २०१५ ला ६२५ टीएमसी पाणीसाठा होता. त्या तुलनेत २०२५ मध्ये १५ ऑक्टोबरला १३३०.९७ टीएमसी पाणीसाठा होता. हा पाणीसाठा २१ एप्रिल २०२६ रोजी ६५३.६३ टीएमसी आहे. गतवर्षीच्या गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०१.७७ टीएससी पाणीसाठा अधिकचा आहे. यावर राज्यातील पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून ऑगस्ट २०२६ अखेर पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने काटकसरीच्या उपायोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्यासोबतच एल-निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पुढील वर्षी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीने आतापासून पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी केले.

महसूल विभागनिहाय पाणीसाठा (कंसात धरण संख्या) यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टीएमसीमध्ये)

नागपूर – (३८७) ८०.७९, ६३.४०,
अमरावती – (२७६) ७३.७२, ६५.१३.
छत्रपती संभाजीनगर – (९२९) १२९.३७, ९७.०९.
नाशिक – (५३९) १०१.९६, ८९.२८.
पुणे – (७२४) २०६.५५, १७४.०४.
कोकण – (१७३) ६१.२४, ६२.९२.
एकूण – (३०२८) ६५३.६३, ५५१.८६.


### राज्यातील प्रमुख धरणांतील पाणीसाठा

■ (यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टिएमसीमध्ये) या क्रमाने)

**कोयना :** ३३.६२, ३६.७६, **जायकवाडी :** ४२.०३, ३४.४४. **उजनी :** १३.३९, (०) **पेंच प्रकल्प समूह :** २६.५७, २६.३५. **इसापूर :** २१.४५, १७.८२. **भातसा :** १५.७०, १४.९१. **गोसीखुर्द :** १४.३१, ५.९३. **खडकवासला धरण समूह :** ११.३२, ९.८२. **मुळा :** ९.५४, १०.५३. **अप्पर वर्धा :** १०.२१, ९.५३. **अप्पर वैतरणा :** ६.५२, ५.९५, **भंडारदरा :** ५.२५, ६.०४ टिएमसी.

# नगर तालुक्यात पाण्यात बुडून दोन मुलांचा मृत्यू

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



तालुक्यातील शेंडी बायपास व बुरूडगाव येथे दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या दुर्दैवी घटनांमध्ये पाण्यात बुडून दोन जणांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दोन्ही घटनांमध्ये कोणताही संशयास्पद प्रकार आढळून आलेला नसून पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. संबंधित पोलीस ठाण्यांकडून पुढील तपास सुरू आहे.

पहिली घटना शेंडी परिसरात घडली. प्रदीप भानुदास नन्नवरे (वय १५, रा. शेंडी बायपास) हा मुलगा हॉटेल किनाराच्या मागील बाजूस असलेल्या पाण्यात पोहण्यासाठी गेला होता. मात्र पोहत असताना तो पाण्यात बुडाला. ही बाब लक्षात आल्यानंतर त्याचा भाऊ विकास अशोक नन्नवरे याने त्याला तातडीने बाहेर काढून उपचारासाठी जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासून त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दुसरी घटना बुरूडगाव परिसरात घडली. विशाल संजय बर्फे (वय २४, रा. सावतानगर, भिंगार) हा युवक बाळू पवार यांच्या विहिरीत बुडाला. घटनेनंतर त्याला त्याच्या नातेवाईकांनी खासगी रूग्णवाहिकेव्दारे जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

SPOT NEWS

## राज्यव्यापी बेमुदत संपाला हिवताप कर्मचाऱ्यांचा पाठिंबा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
राज्यातील सरकारी, निमसरकारी तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली सुमारे १७ लाख कर्मचारी दि. २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संपावर गेले असून, प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी निर्णायक पवित्रा घेतला आहे. महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी मध्यवर्ती संघटना (र.न.२९३४/८४) ही शासनमान्य राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेशी संलग्न असून, संघटना पदाधिकारी तसेच राज्यातील हिवताप कर्मचारी या संपात कालपासूनच सहभागी झालेले आहेत. हिवताप संघटनेच्या वतीने दि. ३ एप्रिल २०२६ रोजी मांडण्यात आलेल्या मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणीसंदर्भात तात्काळ स्पष्टीकरणात्मक अधिसूचना जारी करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यासह हिवताप विभागातील दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजीचा नियुक्ती प्राधिकारी बाबतचा शासन निर्णय रद्द करावा, सुधारित आकृतीबंध, नवीन सेवाप्रवेश नियम लागू करावेत, हिवताप विभागाचे जि.प.कडे होणारे हस्तांतरण रोखावे, तालुका आरोग्य कार्यालयात आरोग्य निरीक्षक व आरोग्य कर्मचारी यांना पदस्थापना द्यावी, कायम प्रवास भत्त्यात वाढ करावी, पदोन्नती व अन्य प्रलंबित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशा विविध मागण्या संघटनेने मांडल्या आहेत.

## खेळाडूंसाठी १० दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
जिल्ह्यात खेळाचा प्रचार, प्रसार होऊन खेळाडूंची संख्या वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच शहरी व गावपातळीवर चांगले खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी ८ ते १४ वयोगटातील व वरिष्ठ गटातील खेळाडूंसाठी १० दिवसांचे प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक खेळाडूंनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे. दि. २८ एप्रिल ते ७ मे २०२६ या कालावधीत सकाळी ६ ते ८.३० व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळेत या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खो-खो या खेळाचे शिबिर बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर व आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर, शेवगाव येथे होणार आहे. बॅडमिंटन व कुस्ती खेळासाठी जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे शिबिर होईल. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक व अद्ययावत प्रशिक्षण शिबिरात खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती व कबड्डी या खेळांच्या अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवावा. प्रशिक्षण शिबिराच्या अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## कार्यकर्त्याच्या वैयक्तिक वादावरून शहर विकासाला विरोध; काळे गटावर आरोप

**● कोपरगाव । वीरभूमी –**

नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेसाठी काळे गटाचे नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने त्यांनी शहराच्या विकासात्मक निर्णयांना विरोध दर्शविल्याचा आरोप करण्यात आला आहे. एका कार्यकर्त्याने स्वामी समर्थ केंद्र प्रमुखांशी केलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर काळे गटाची भूमिका समोर आली असून, यामुळे त्यांचा खरा चेहरा उघड झाल्याची टीका करण्यात येत आहे. एका कार्यकर्त्याच्या वैयक्तिक भूमिकेमुळे संपूर्ण शहराच्या विकासासंबंधी महत्त्वाचे ठराव संमत होत असताना काळे गटाच्या नगरसेवकांनी अप्रत्यक्ष विरोध केल्याचा आरोप करण्यात आला. शहरातील शांतता भंग करण्याचे प्रकार कोण करत आहे, हे नागरिकांना ठाऊक असल्याचेही नमूद करण्यात आले. तसेच, मागील चार वर्षांत अनेक कामांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे समोर येत असून, मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून सातत्याने केला जात आहे. या पार्श्वभूमीवर श्वेतपत्रिका काढण्याची मागणी करण्यात येत आहे. शहरातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर पारदर्शक कारभार करण्याच्या भूमिकेतून श्वेतपत्रिका मांडण्याचा विषय पुढे येणार असल्याची जाणीव झाल्याने विरोधी नगरसेवकांनी सभेला अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

# राजकीय मतभेद विसरून विकासासाठी एकत्र येण्याचा संदेश

**डॉ. सुजय विखे यांनी घेतली डॉ. कल्याणी आरणे यांची भेट । शिर्डीच्या विकासासाठी भाजपसोबत काम करण्यास तयार : डॉ. आरणे**

**● शिर्डी । वीरभूमी –**
नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीनंतर काही महिन्यांनी शिर्डीतील स्थानिक राजकारणात सकारात्मक घडामोड पाहायला मिळाली. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी नगरपरिषद निवडणुकीत विरोधात उभ्या राहिलेल्या डॉ. कल्याणी आरणे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत संवाद व सहकार्याचा नवा संदेश दिला.

या भेटीदरम्यान डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, राजकारण हे वैयक्तिक मतभेद किंवा द्वेषासाठी नसून विकासासाठी असते. प्रचारादरम्यान डॉ. आरणे यांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा उल्लेख केला होता, त्या संदर्भाने समविचारी व्यक्तींना एकत्र आणणे ही संघटनात्मक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिर्डीच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसमावेशक राजकारण आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.



तसेच, सामान्य कुटुंबातून पुढे येत वैद्यकीय क्षेत्रात आणि राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या डॉ. कल्याणी आरणे यांच्या प्रवासाचे त्यांनी कौतुक केले. समाजातील कष्टकरी घटकांमधून नेतृत्व पुढे येणे ही लोकशाहीची ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली विकासाची दिशा अधिक मजबूत होत असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

डॉ. कल्याणी आरणे यांनी सांगितले की, अचानक झालेल्या या भेटीमुळे त्यांना आश्चर्य वाटले. महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार पाहुण्याचे आदरातिथ्य करत त्यांनी डॉ. विखे यांना घरगुती जेवणाचा आग्रह केला. उच्च पदावर असूनही साधेपणाने घरचे जेवण स्वीकारल्याबद्दल त्यांनी विखे पाटलांचे विशेष कौतुक केले.

या भेटीत केवळ औपचारिक चर्चा न राहता नागरिकांच्या प्रश्नांवरही सविस्तर संवाद झाला. निवडणुकीदरम्यान मांडलेले विकासाचे मुद्दे मार्गी लागतील, असा विश्वासही डॉ. आरणे यांनी व्यक्त केला.

राजकीय भूमिकेबाबत बोलताना त्यांनी भारतीय जनता पक्ष हा विचारधारेवर आधारित आणि संस्कृती जपणारा पक्ष असल्याचे नमूद केले. शिर्डीच्या विकासासाठी भाजपसोबत काम करण्याची संधी मिळाल्यास ती स्वीकारण्यास मी तयार आहे, असे सांगत त्यांनी भविष्यातील सहकार्याचे संकेत दिले.

## पद्मश्री दया पवार यांच्या स्मारकासाठी निधी द्यावा

**धामणगाव आवारी ग्रामपंचायतीची मागणी**

**● अकोले । वीरभूमी–**
महाराष्ट्रातील थोर लेखक व कवी दिवंगत पद्मश्री दया पवार यांचे साहित्य व सामाजिक क्षेत्रातील कार्य सर्वश्रुत आहे. त्यांचे मूळ जन्मगाव अकोले तालुक्यातील धामणगाव आवारी असून, त्यांच्या नावावर या गावात आजही शेतजमीन आहे. त्या ठिकाणी त्यांचे स्मारक उभारावे, अशी सर्व समाजाची भावना आहे.

धामणगाव आवारी (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथे पद्मश्री दया पवार यांचे स्मारक उभारण्यासाठी मदत करावी व खासदार निधीतून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामपंचायत धामणगाव आवारी यांनी निवेदनाद्वारे खासदार ज्योती वाघमारे यांच्याकडे केली.

खा. ज्योती वाघमारे या अकोले तालुक्याच्या दौऱ्यावर आल्या असताना ग्रामपंचायतीच्या वतीने ही मागणी करण्यात आली. यावेळी पद्मश्री दया पवार यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी द्यावा, अशी विनंती करण्यात आली.

या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत स्मारकासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन खासदार ज्योती वाघमारे यांनी दिल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब भोर यांनी दिली.

## संजीवनी फार्मसीच्या आठ विद्यार्थ्यांना इंटस फार्मास्युटिकल्समध्ये नोकरी

**प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नांना यश । आकर्षक पॅकेजसह विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार**

**● कोपरगाव । वीरभूमी –**
इंटस फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या नामांकित कंपनीने संजीवनी फार्मसी महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांना आकर्षक पॅकेजसह नोकरीची संधी दिली आहे. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे या विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये बी. फार्मसीच्या एका व एम. फार्मसीच्या सात विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच या विद्यार्थ्यांना करिअरची संधी मिळाल्याने त्यांच्या आनंदात भर पडली आहे.



निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये एम. फार्मसीचे दिव्येश रमेश म्हात्रे, कृष्णा रामहरी गोरे, झुंबर रामनाथ पोटे, तुषार नवनाथ पाटील, ऋतिक दत्तु काळे, विवेक विष्णू पारखे, यश दिपक कदम तसेच बी. फार्मसीचा अतुल मच्छिंद्र आहेर यांचा समावेश आहे.

संजीवनी फार्मसी महाविद्यालयास ऑटोनॉमस दर्जा प्राप्त असून, त्यामुळे काळाच्या गरजेनुसार उद्योगाभिमुख व आधुनिक अभ्यासक्रम राबविणे शक्य होत आहे. याचा परिणाम म्हणून येथील विद्यार्थी नामांकित कंपन्यांच्या निवड प्रक्रियेत यशस्वी ठरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्तापूर्ण जडणघडण होऊन त्यांना परीक्षेपूर्वीच नोकरीची संधी मिळत असल्याने पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. रावसाहेब शेंडगे तसेच टी अँड पी विभागाचे डीन डॉ. प्रमोद कडू उपस्थित होते.

# नगरी पोलीस अधिकाऱ्याने गाजवली दिल्लीतील 'सीआरपीएफ'ची परेड

**महेश जंजिरे यांनी दिल्लीच्या गुरुग्राममध्ये केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांसमोर केले शानदार संचलन..।**

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
नवीदिल्ली येथील गुरुग्राम मधील केंद्रीय राखीव पोलीस दल अकादमीत 'सीआरपीएफ' मधील असिस्टंट कमांडट या पदाचे एक वर्षाचे अत्यंत खडतर असे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४६ अधिकाऱ्यांना आज (दि. २२) रोजी दीक्षांत समारंभात देशसेवेची शपथ देण्यात आली. यावेळी झालेल्या पासिंग आऊट परेडमध्ये श्रीगोंदा येथील महेश जंजिरे यांनी शानदार संचालन करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



या परेडसाठी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजय कुमार यांच्यासह 'सीआरपीएफ'चे विशेष महानिरीक्षक जकी अहमद, अकादमीचे संचालक अमित कुमार यांच्यासह 'सीआरपीएफ' चे अधिकारी, महेश शिंदे यांच्यासह प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४६ असिस्टंट कमांडट अधिकाऱ्यांचे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते.

अहिल्यानगर येथील महेश जंजिरे यांनी एक वर्षाच्या कठोर आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणानंतर असिस्टंट कमांडट म्हणून उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. महेश जंजिरे यांच्या या यशामुळे अहिल्यानगरसह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या यशाने यूपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांना प्रेरणा मिळत आहे.

या दीक्षांत समारंभासाठी महेश जंजिरे यांचे वडील ईश्वर जंजिरे, आई सुनीता जंजिरे, पत्नी वास्तुविशारद काजल दरेकर, सामाजिक कार्यकर्ते सुनील दरेकर, अश्विनी दरेकर, ॲड. सविता बोठेपाटील यांच्यासह अहिल्यानगर व श्रीगोंदा येथील विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

### युपीएससी परीक्षेत मराठी तरुणांचा टक्का वाढण्यासाठी मदतीची तयारी : महेश जंजिरे

■ महेश जंजिरे यांनी यावेळी सांगितले की, युपीएससीमध्ये मराठी टक्का वाढायला हवा. मराठी मुलांमध्ये युपीएससी परीक्षेबाबतची विनाकारण असलेली भीती व न्यूनगंड दूर करुन त्यांच्यात अभ्यासाची जिद्द व प्रशासनात अधिकारी होण्याची उर्मी निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी तसेच शिस्तबद्ध अभ्यासासाठी महाराष्ट्रातील इच्छुक तरुणांना मदत करण्याची आपली तयारी आहे, असे महेश जंजिरे यांनी सांगितले. त्यांच्या या भूमिकेचे दीक्षांत समारंभाला उपस्थित मराठी मंडळींनी जोरदार स्वागत करुन त्यांचे अभिनंदन केले.

# पाथर्डीत दुसऱ्या दिवशीही राज्य कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

**शासकीय कार्यालयांत शुकशुकाट । कामकाज ठप्प झाल्याने नागरिकांचे हाल**

**● पाथर्डी । वीरभूमी–**
राज्य शासनाकडे प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर पुकारण्यात आलेल्या बेमुदत संपाला पाथर्डी तालुक्यातही मोठा प्रतिसाद मिळत आहे. संपाचा दुसरा दिवस बुधवारीही तीव्र स्वरूपात सुरू राहिला. महसूल विभागासह आरोग्य विभाग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संपात सहभाग नोंदवत शासनाच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

पाथर्डी येथील शासकीय कार्यालय परिसरात कर्मचारी मोठ्या संख्येने एकत्र जमले होते. यावेळी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संघटनेचे तालुका अध्यक्ष वैभव कराड, महसूल कर्मचारी संघटना पाथर्डीचे अध्यक्ष दीपक मिरपगार, कार्यालयीन कर्मचारी दीपक कदम, सतीश थारकर, दादासाहेब वावरे, शंकर भडके, इनामदार, भिंगारदिवे, श्रीमती माळी मॅडम, श्रीमती डोळे मॅडम, श्रीमती तुपे मॅडम आदी कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी शासनाने तातडीने मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला.



राज्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदांची भरती करणे, वेतन विसंगती दूर करणे, कंत्राटी पद्धतीला विरोध, पदोन्नती प्रक्रिया गतीमान करणे तसेच कर्मचारी हिताच्या इतर मागण्यांचा समावेश असल्याचे आंदोलकांनी सांगितले. शासनाने वारंवार आश्वासने देऊनही ठोस निर्णय घेतला नसल्याने अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या संपाचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर होत आहे. महसूल विभागातील कामकाज ठप्प झाल्याने दाखले, उतारे, उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जमीन संबंधित कामे तसेच विविध प्रशासकीय प्रक्रिया रखडल्या आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना तहसील कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालयांत वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून अनेकांना निराश होऊन परत जावे लागत आहे. आरोग्य व शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या सहभागामुळे काही सेवा व्यवस्थांवरही परिणाम जाणवत आहे.

पाथर्डी शहरासह ग्रामीण भागातील शासकीय कार्यालयांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसून आला. अनेक ठिकाणी कर्मचारी अनुपस्थित असल्याने कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः शेतकरी, विद्यार्थी व विविध शासकीय योजनांसाठी आलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, संपामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याची जाणीव महसूल कर्मचारी संघटनेने व्यक्त केली आहे. संघटनेच्या वतीने दिलगिरी व्यक्त करण्यात आली असून शासनाने लवकरात लवकर मागण्यांवर निर्णय घेतल्यास परिस्थिती पूर्ववत होईल, असे आंदोलकांनी सांगितले.

राज्यभर सुरू असलेल्या या आंदोलनाकडे शासन कोणती भूमिका घेते आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## काला फक्त वारकरी संप्रदायातच

**रामगिरीजी महाराज । श्रीक्षेत्र शिंगवे येथे हरिहर मंदिर वर्धापन दिन साजरा**

**● कोपरगाव । वीरभूमी–**
श्रीकृष्ण नामाचा मनी व कंठात धारण केल्याने जीवनातील अज्ञानाचा अंधकार दूर होतो, तर काला हा केवळ वारकरी संप्रदायातच होतो, असे प्रतिपादन महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.



तालुक्यातील श्रीक्षेत्र शिंगवे येथे हरिहर मंदिराच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी कंठी धरीला कृष्ण मनी, अवघा जनी प्रकाश हा संत तुकाराम महाराजांचा अभंग निरूपणासाठी घेतला.

विवेचन करताना महाराज म्हणाले की, वारकरी संप्रदायात काल्याचे विशेष महत्त्व असून ते इतर कोणत्याही संप्रदायात आढळत नाही. श्रीकृष्णाच्या गोकुळ, मथुरा आणि द्वारका येथील जीवनचरित्राचे विविध पैलू काल्याच्या कीर्तनातून उलगडले जातात.

श्रीकृष्णाच्या बाललीलांचे वर्णन करताना त्यांनी सांगितले की, जो दुसऱ्याला आनंद देतो तो नंद आणि जो दुसऱ्याच्या सुखाचा नाश करतो तो कंस होय. समाजात दुसऱ्याला सुखाने जगू न देणारी वृत्ती नष्ट करण्याचे कार्य भगवंत करतात. भक्तीभावाने प्रत्येक इंद्रियातून भगवद्रसाचा अनुभव घेणारी वृत्ती म्हणजे गोपी होय, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यश प्रदान करणारी वृत्ती म्हणजे यशोदा आणि सर्वांना आकर्षित करणारी शक्ती म्हणजे श्रीकृष्ण, असे सांगत त्यांनी श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले. कृष्ण या शब्दाचे कृषी, भूमी, जीव असे विविध अर्थही त्यांनी विशद केले.

स्वप्नातील भगवद् दर्शनापेक्षा ध्यानातील दर्शन श्रेष्ठ असून, ध्यानातील दर्शनापेक्षा प्रत्यक्ष दर्शन श्रेष्ठ आहे; मात्र सर्वत्र भगवद् दर्शन अनुभवणे हे सर्वश्रेष्ठ असल्याचेही महाराजांनी सांगितले.

कार्यक्रमात संगीत साथ हभप रामभाऊ बर्डे, रामकृष्ण महाराज, बाळासाहेब महाराज रंजाळे, माऊली महाराज, अमोल बडाख, दिनकर मोईन, रामचंद्र सावंत यांनी केली. आचार्य भगवान शास्त्री, गणेश शास्त्री, संदिपान महाराज, मधुकर महाराज, शिवाजी ठाकरे, डी.पी. मोरे, बाबासाहेब लासुरे, विजय लासुरे, प्रकाश बाभूळके, फकीर बोरणारे, पत्रकार जनार्दन जगताप, प्रशांत टेके आदी मान्यवर उपस्थित होते.

वारी, कान्हेगाव, सडे, शिंगवे, पिंपळवाडी, पुणतांबे, कोपरगाव, रुई, भोजडे, संवत्सर आदी गावांतील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण नियोजनासाठी शिंगवे येथील तरुण मित्र मंडळ व बजरंग दलातील स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www.veerbhuminews.com

## ज्यांनी जागा दिली त्यांनाच धक्काबुक्की केल्याच्या निषेधार्थ

# कोपरगावात राष्ट्रवादीचा नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार

### स्वामी समर्थ मंदिर भूमिपूजनावेळी झालेल्या घटनेवरून सत्ताधाऱ्यांवर टीका । विकासाला पाठिंबा कायम असल्याचे स्पष्टीकरण

**● कोपरगाव । वीरभूमी -**

निधी मिळवण्यात काडीचा संबंध नसताना आपल्या नेत्याला खुश करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी आणलेल्या निधीतील कामांचे भूमिपूजन करणे आणि ज्यांनी जागा दिली त्यांनाच गुंडांमार्फत धक्काबुक्की करणे हा सत्तेचा उन्माद असल्याचा आरोप करत, या घटनेच्या निषेधार्थ बुधवार (दि. २२) रोजी झालेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बहिष्कार टाकला.

रविवार (दि. १९) रोजी कोपरगाव शहरातील सुभद्रानगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, सभामंडप व सुशोभीकरण कामाच्या भूमिपूजनावेळी सत्ताधारी कोल्हे गटाकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना धक्काबुक्की करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. विशेष म्हणजे, मंदिराच्या सभामंडपासाठी जागा देणाऱ्या माजी नगरसेविकेचे पती व राष्ट्रवादीचे ज्येष्ठ पदाधिकारी बाळासाहेब आढाव यांनाही धक्काबुक्की झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्या सौ. गौरी पहाडे यांनी सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत गौतम बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषद घेत, नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली.

यावेळी गौरी पहाडे म्हणाल्या की, आमदार आशुतोष काळे यांनी नेहमीच कोपरगाव शहराच्या विकासाला प्राधान्य दिले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व नगरसेवक शहर विकासाच्या प्रत्येक विषयाला पाठिंबा देत आहोत आणि पुढेही देऊ. मात्र शहराची शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही गोष्टीला आमचा पाठिंबा राहणार नाही. सत्ताधाऱ्यांनी श्रेयवादापेक्षा विकासकामांना प्राधान्य द्यावे.

तसेच, आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नातून अनेक वर्षांचा पाणी प्रश्न सुटला असून मागील सहा वर्षांत शहरात विकासकामे झाली आहेत. मात्र सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण होत नसल्याची टीका त्यांनी केली.

यावेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी सुनील गंगुले यांनी सांगितले की, ५ नंबर साठवण तलावाचे काँक्रीटीकरण जसे करण्यात आले, त्याप्रमाणे १ ते ४ साठवण तलावांचेही काँक्रीटीकरण करावे, अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. त्यासाठी निधी मिळवण्याचे प्रयत्न सुरू असून विरोधकांकडून याबाबत अपप्रचार केला जात आहे.

सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचा दुरुपयोग केला जात असल्याची टीकाही त्यांनी केली. पूर्वी बहुमत असताना विकासकामांना विरोध करणारेच आता सत्तेत येऊन गुंडगिरीला प्राधान्य देत असल्याचा आरोप त्यांनी केला. आमदार आशुतोष काळे शहराच्या विकासासाठी निधी आणत आहेत, तसेच सत्ताधाऱ्यांनीही निधी आणण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा नागरिकांची असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक, पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सभेत पत्रकारांना प्रवेश नाकारल्याने प्रश्नचिन्ह

■ पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. मात्र बुधवार (दि. २२) रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पत्रकारांना पुन्हा एकदा प्रवेश नाकारण्यात आल्याची बाब समोर आली आहे. सत्ताधारी शहर विकासाचे निर्णय घेत असतील, तर ते पत्रकारांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तरीही पत्रकारांना सभेत प्रवेश का नाकारला जातो, हा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत सत्ताधाऱ्यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी नगरसेवक मेहमूद सय्यद यांनी केली आहे.

---

## अहिल्यानगरमध्ये डॉ. अग्रवालस् आय हॉस्पिटलचे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्र सुरू

### ३१ मेपर्यंत मोफत नेत्रतपासणी; प्रगत तंत्रज्ञानासह सर्वसमावेशक सेवा एकाच छताखाली

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवालस् आय हॉस्पिटलने आज अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




वेगाने विकसित होत असलेल्या अहिल्यानगर परिसरातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे. उद्घाटनाच्या निमित्ताने ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. अपॉइंटमेंटसाठी कृपया ८९२५५ १०८०७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

६,७३५ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (लेसिक), कॉर्निया, काचबिंदू, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार परिणाम सुनिश्चित केले जातील.

या प्रसंगी बोलताना आमदार श्री. संग्राम जगताप म्हणाले, अहिल्यानगरसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागांमध्ये सुलभ आणि विशेषीकृत आरोग्यसेवेची गरज वाढत आहे. डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने प्रगत नेत्रसेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. यामुळे दृष्टीसंबंधित समस्यांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली जाईल.

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, डॉ. अग्रवालस् आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. अहिल्यानगर केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्री. राहुल अग्रवाल म्हणाले, आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार, परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.

---

## सेनापती बापट मल्टिस्टेट ठेवीदारांचा २३ एप्रिलला विजय औटींच्या घरासमोर उपोषणाचा इशारा

### शेकडो कोटींच्या घोटाळ्याचा आरोप । मालमत्ता जप्त करून प्रशासक नेमण्याची ठेवीदारांची मागणी

**● पारनेर । वीरभूमी -**

पारनेर तालुक्यातील हजारो गोरगरीब शेतकरी व कष्टकऱ्यांच्या ठेवी अडकलेल्या सेनापती बापट मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीविरोधात ठेवीदारांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. गुन्हा दाखल होऊनही मुख्य आरोपी मोकाट असल्याचा आरोप करत, दोषींना अटक करून ठेवीदारांचे पैसे परत मिळावेत या मागणीसाठी येत्या गुरुवार, २३ एप्रिल २०२६ रोजी संस्थापक माजी आमदार विजय औटी यांच्या निवासस्थानासमोर पारनेर बाजार तळावर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा ठेवीदारांनी दिला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन परवानगी मागण्यात आली आहे.

### माजी आ. विजय औटींवर ठेवीदारांचा रोष

■ लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी असताना शेकडो कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप करत ठेवीदारांनी संताप व्यक्त केला आहे. आमच्या कष्टाचा एक-एक पैसा परत मिळेपर्यंत लढा सुरूच राहील. सत्ता आणि पदाचा वापर करून आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास जनता योग्य धडा शिकवेल, अशी तीव्र प्रतिक्रिया ठेवीदारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

सेनापती बापट मल्टिस्टेट सोसायटीविरोधात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४६३/२०२५ अन्वये महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण कायदा (MPID) आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हे दाखल आहेत. संस्थेच्या २९ शाखांमधून शेकडो कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या होत्या. मात्र मुदत संपूनही ठेवीदारांना पैसे न मिळाल्याने अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत.

ज्येष्ठ नागरिकांच्या औषधोपचाराचा खर्च, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न तसेच दैनंदिन गरजा भागवणे कठीण झाल्याचे ठेवीदारांनी सांगितले. जिल्हा सत्र न्यायालयाने काही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले असतानाही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ठेवीदारांच्या निवेदनात नमूद आहे की, मुख्य आरोपी फरार असून काही आरोपी जामिनावर बाहेर आहेत. त्यामुळे तपास यंत्रणांनी तत्काळ कठोर कारवाई करावी, संस्थेचे फॉरेन्सिक ऑडिट करून आर्थिक गैरव्यवहाराची रक्कम निश्चित करावी, तसेच संस्थेच्या सर्व संचालकांच्या वैयक्तिक मालमत्ता जप्त करून त्यातून ठेवीदारांचे पैसे परत द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, संस्थेवर प्रशासक नेमण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या गृह विभागाकडे पाठवावा, अशीही मागणी ठेवीदारांनी केली आहे. २३ एप्रिल रोजी होणारे उपोषण शांततामय व सनदशीर मार्गाने होणार असून प्रशासनाने तातडीने तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

---

## राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत आबासाहेब काकडे विद्यालयाच्या विराज धोंडेला कांस्यपदक

**● शेवगाव । वीरभूमी -**

देशाची राजधानी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये शेवगावच्या कर्मयोगी आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी विराज धोंडे याने उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकावले आहे.




दिल्ली सरकारच्या शिक्षण व क्रीडा संचालनालयामार्फत आयोजित या स्पर्धेत विराज धोंडे याने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले. १६ ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान झालेल्या या चुरशीच्या स्पर्धेत त्याने आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर कांस्यपदकाची कमाई केली.

याच स्पर्धेत विद्यालयाचा दुसरा खेळाडू समर्थ दुसुंगे यानेही महाराष्ट्र संघातून सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्या खेळाचे सर्व स्तरांवर कौतुक होत आहे.

या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा बेसबॉल संघटनेचे अध्यक्ष अरुण चंद्रे, उपाध्यक्ष सुधीर चापळगावकर आणि सचिव मकरंद कोऱ्हाळकर यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत, संतोष ढोले, सचिन वाल्हेकर, विक्रम घुटे आणि वैष्णवी फलके यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे, हर्षदाताई काकडे, पृथ्वीसिंह काकडे यांनी अभिनंदन केले आहे.

---

## कलेच्या उपासनेतून जीवनात खरा आनंद : पोनि.विलास पुजारी

### पाथर्डीत तालुकास्तरीय पारितोषिक व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**● पाथर्डी । वीरभूमी-**

कलेच्या उपासनेतूनच माणसाला जीवनातील खऱ्या आनंदाची प्राप्ती होते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी किमान एक तरी कलागुण जोपासला पाहिजे, असे प्रतिपादन पाथर्डीचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी केले. ते श्री तिलोक जैन विद्यालयात आयोजित तालुकास्तरीय पारितोषिक व पुरस्कार वितरण कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



पाथर्डी पंचायत समितीचा शिक्षण विभाग व पाथर्डी तालुका कलाशिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये शिक्षण विस्तार अधिकारी अनिल भवार, जिल्हा कलाशिक्षक संघटनेचे संस्थापक संजय पठाडे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक सुनिल दानवे, जिल्हा सचिव मंगेश काळे, पर्यवेक्षिका मनीषा मिसाळ, डॉ. आरती जायभाय, नगमा खान आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात बाल कलाकार विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शासकीय बाल चित्रकला स्पर्धेतील पाथर्डी तालुक्यातील १६ विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना भेटवस्तू व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी श्री तिलोक जैन विद्यालयाचे कलाशिक्षक संजय गटागट यांना 'पाथर्डी कलाभूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच बंडोपंत गोडगे, दिपक राठोड, संजय ससाणे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आत्माराम दहिफळे यांचा पर्यवेक्षक पदावर रुजू झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात सुनिल दानवे, संजय पठाडे, अनिल भवार यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला उपक्रम महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थी व कलाशिक्षकांच्या चित्र व शिल्पकृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

प्रास्ताविक आत्माराम दहिफळे यांनी केले, सूत्रसंचालन गणेश सरोदे यांनी तर आभार संजय ससाणे यांनी मानले.

### तालुकास्तरीय बाल चित्रकला स्पर्धेतील विजेते

■ **पहिली ते दुसरी** - अवंतिका जायभाय (प्रथम), ज्ञानेश्वरी पाचे (द्वितीय), अवनी शिरसाठ (तृतीय). **तिसरी ते चौथी** - हंसिका आठरे (प्रथम), सिद्धार्थ एकसिंगे (द्वितीय), दुर्वा तुपे (तृतीय). **पाचवी ते सातवी** - अमृता हिंगे (प्रथम), ऋतुजा पाटेकर (द्वितीय), श्रुती मिसाळ (तृतीय), अराध्या चांगुणे (चतुर्थ), मोहिनी घोरपडे (पाचवा). **आठवी ते दहावी** - पूर्वी कदम (प्रथम), अथर्व जाधव (द्वितीय), किरण गर्जे (तृतीय), मानसी कदम व साक्षी वाबळे (उत्तेजनार्थ) राष्ट्रीय पातळीवर दिल्ली येथे निवड झालेले विद्यार्थी आरजू शेख, अथर्व जाधव, प्राची घाटूळ व तमन्ना शेख यांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

---

# अकोलेतील 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमालेतून पुरोगामी विचारांचा जागर

### व्याख्याने, कविता व महानाट्याच्या माध्यमातून वैचारिक पेरणीला नवा उभारी; श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अकोले । वीरभूमी-**

अकोले येथे पार पडलेल्या शिव-फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमालेतून पुरोगामी विचारांचा प्रभावी जागर घडला. समतेची गीते, विविध वक्त्यांची प्रभावी मांडणी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित संघम् शरणम् गच्छामी या महानाट्याच्या सादरीकरणामुळे ही व्याख्यानमाला खऱ्या अर्थाने विचारांची मशाल पेटवणारी ठरली. श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देणारा ठरला.

अकोले तालुक्यात सामाजिक चळवळींसोबत वैचारिक व सांस्कृतिक अभिसरण घडवणारे उपक्रम सातत्याने राबविले जातात. महात्मा फुले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित ही व्याख्यानमाला त्यापैकी एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. गेल्या दोन दशकांत या व्याख्यानमालेने वैचारिक उंची गाठली होती; मात्र काही काळ खंड पडला होता.

यावर्षी भाऊसाहेब चासकर, प्रा. विजय भगत, रवी रूपवते, प्रा. संदेश कासार, अनिल मोहिते, प्रा. किरण जाधव या शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत बळीराजा अभ्यास मंडळ व संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या माध्यमातून व्याख्यानमाला पुन्हा सुरू केली. विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे प्रबोधनाचा प्रवाह नव्या जोमाने सुरू झाला.

व्याख्यानमालेची सुरुवात ज्येष्ठ पत्रकार व रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते पी. साईनाथ यांच्या शेती आणि शेतकऱ्यांसमोरील आव्हाने या व्याख्यानाने झाली. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना न झाल्यास शेती संकट अधिक गडद होईल, असा इशारा त्यांनी दिला.

दुसऱ्या दिवशी कवी डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या चल दंगल समजून घेऊ या कविता सादरीकरणाने वातावरण भारावले. तिसऱ्या दिवशी शामसुंदर सोन्नर महाराज यांनी समतेची शिकवण देणारा वारकरी संप्रदाय आणि आजचा महाराष्ट्र या विषयावर विचार मांडले.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त हैदराबाद येथील अभ्युदय कला अकादमीच्या २१ कलाकारांनी सादर केलेल्या संघम् शरणम् गच्छामी या महानाट्याने व्याख्यानमालेचा समारोप झाला. या सादरीकरणाने प्रेक्षकांना विचारप्रवृत्त केले. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही प्रायोजकांशिवाय लोकवर्गणीतून आयोजन करण्यात आले. अडीचशेपेक्षा अधिक नागरिकांनी २०० ते ५००० रुपयांपर्यंत योगदान दिले. समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करून व्याख्यानमालेचा प्रचार करण्यात आला, त्यामुळे मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित राहिले.



आमदार डॉ. किरण लहामटे यांनी चारही दिवस श्रोता म्हणून उपस्थिती लावली. तसेच डॉ. अजित नवले, विजय वाकचौरे, विनय सावंत यांचीही उपस्थिती लाभली. अनेक दिवसांनी अशा दर्जेदार व्याख्यानमालेतून अकोलेकरांना वैचारिक मेजवानी मिळाली, असे उद्गार समारोप प्रसंगी आमदार लहामटे यांनी काढले.

या व्याख्यानमालेमुळे अकोले तालुक्यात वैचारिक पेरणीचा नवा अध्याय सुरू झाल्याचे आशादायी चित्र निर्माण झाले आहे.